**<u>ठळक बातम्या</u>**

- डिजिटल इंडिया उपक्रमानं नागरिकांना सक्षम बनवत सर्वांगीण विकासाला गती दिली असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात १८३ रुपये ५० पैशांची कपात

- महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढला, मुंबईला पाणी पुरवणाऱ्या तलावांच्या पाणलोट क्षेत्रातही पाऊस सुरू

- ज्येष्ठ दिग्दर्शक विजया मेहता यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

**आणि**

- आयसीसी क्रिकेट क्रमवारीत टी-२० आंतरराष्ट्रीय फलंदाजांमधे इशान किशन अव्वल स्थानावर

**<><><><><>**

डिजिटल इंडिया उपक्रमानं सुशासनाची नव्यानं व्याख्या केली असून, नागरिकांना सक्षम बनवत सर्वांगीण विकासाला गती दिली आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. डिजिटल इंडिया उपक्रमानं जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर प्रभाव टाकला आहे, असं प्रधानमंत्र्यांनी या उपक्रमाला ११ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्तानं दिलेल्या संदेशात म्हटलं आहे.

गरीब आणि वंचित घटकांना सक्षम करण्याबरोबरच नागरिकांचं दैनंदिन जीवन अधिक सुलभ करण्यात डिजिटल इंडियाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे, असंही ते म्हणाले. ऑप्टिकल फायबर जाळ्याचा विस्तार आणि डिजिटल व्यवहारात झालेली वाढ यामुळे या उपक्रमाच्या अभूतपूर्व यशाकडे संपूर्ण जगाचं लक्ष वेधलं गेल्याचं त्यांनी सांगितलं. अखंड आणि सुलभ डिजिटल पेमेंट प्रणाली तसंच थेट लाभ हस्तांतरणामुळे लाभार्थ्यांपर्यंत पारदर्शकपणे शासकीय लाभ पोहोचत आहेत, असं

ते म्हणाले. तंत्रज्ञान नागरिकांचं जीवन अधिक सुलभ करणारं प्रभावी साधन बनल्याचं त्यांनी सांगितलं .

**<><><><><>**

रोजगाराची हमी देणारा विकसित भारत जी-रामजी अर्थात विकसित भारत-रोजगार आणि उपजिविका हमी ग्रामीण कायदा २०२५ आजपासून देशाच्या ग्रामीण भागात लागू झाला. प्रत्येक आर्थिक वर्षात १२५ दिवसांच्या वेतनासह रोजगाराची हमी देणारा हा कायदा ग्रामीण भारताला सक्षम करेल, असा विश्वास ग्रामविकास मंत्रालयानं व्यक्त केला आहे. याच्या अंमलबजावणीसाठी यंदाच्या आर्थिक वर्षात ९५ हजार ६९२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विहित मुदतीत काम मिळालं नाही तर बेरोजगारी भत्ता देण्याची तरतूद नव्या कायद्यात आहे. हा कायदा जुन्या मनरेगा कायद्याची जागा घेणार आहे. पात्र कामगारांना दररोज रोजगार मिळवा, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे, या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारनं राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या समन्वयातून सर्व तयारी पूर्ण केली आहे, असं केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

पेट्रोलियम कंपन्यांनी आजपासून १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या किमती १८३ रुपये ५० पैशांनी कमी केल्या आहेत. त्यामुळे दिल्लीत हा सिलेंडर दोन हजार ९३० रुपयांना मिळेल. या कपातीमुळे हॉटेल्स, कँटीन तसेच इतर संबंधित व्यवसायांना दिलासा मिळणार आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात अनेक  ठिकाणी आज पावसानं जोरदार हजेरी लावली.

मुंबईत गोरेगाव, जोगेश्वरी, मालाड, बोरिवली आणि मुलुंड या पश्चिम उपनगरांमध्ये, तसंच भांडुप, विक्रोळी, घाटकोपर आणि कुर्ला या पूर्व उपनगरांमध्ये आज जोरदार पावसाची नोंद झाली.

**नवी मुंबई** आणि ठाणे येथेही आज जोरदार पाऊस झाला. पावसामुळे नेरुळ, उरण फाटा, नेरुळ, कोपरखैरणे, दहिसर गाव, सानपाडा या भागात पाणी साचल्यानं वाहतुकीवर परिणाम होऊन जनजीवन विस्कळीत झालं.

**रत्नागिरी** जिल्ह्यात पावसाचा जोर आज सलग तिसऱ्या दिवशी कायम होता. चिपळूण-गुहागर मार्गावर अति पावसामुळे माती रस्त्यावर आली तर लांजा तालुक्यात मुंबई-गोवा महामार्गावर वेरळ घाटात दरड कोसळली.

**पालघर** जिल्ह्याला उद्या रेड अलर्ट असल्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातल्या सर्व शाळा आणि महाविद्यालयांना उद्या सुट्टी जाहीर केली आहे.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात आजही पावसाचा जोर कायम आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी ३ ते ५ जुलै पर्यंत ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. समुद्र खवळलेला असून ताशी ४० ते ५० किलोमोटर वेगानं वारे वाहण्याची शक्यता आहे. मच्छिमारांना समुद्रात न जाण्याच्या सूचना दिल्या आहेत.

मुंबईला पाणी पुरवणाऱ्या तलावांच्या पाणलोट क्षेत्रातही पाऊस सुरू आहे. त्यामुळे शहराला पाणी पुरवणाऱ्या ७ तलावात सुमारे १ अब्ज लिटर इतका पाणी साठा वाढला आहे.

**<><><><><>**

नवी दिल्ली, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशाला जोडणाऱ्या विविध रस्ते प्रकल्पांना आज केंद्र सरकारने मंजुरी दिली. यात वसंत कुंज, नवी दिल्ली ते द्वारका महामार्गासाठी सहा पदरी रस्त्याच्या बोगद्याला तसंच उत्तर प्रदेशात कानपूर-कबराई विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३४ वर ११७ किलोमीटरपेक्षा जास्त प्रवेश नियंत्रित मार्गालाही सरकारनं मंजुरी दिली. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी

वैष्णव यांनी ही माहिती दिली. द्वारका महामार्गासाठीच्या बोगद्याबाबत त्यांनी सांगितलं....

**होल्ड - बाईट - अश्विनी वैष्णव**

**<><><><><>**

सुप्रसिद्ध नाट्य आणि चित्रपट दिग्दर्शक विजया मेहता यांच्या पार्थिवावर आज मुंबईत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचं काल रात्री त्यांच्या निवासस्थानी निधन झालं. त्या ९२ वर्षांच्या होत्या. 'विजयाबाई' या नावानं त्या कलावर्तुळात सुपरिचित होत्या. मराठी प्रायोगिक नाट्यचळवळीचा पाया त्यांनी घातला होता. नाट्यदिग्दर्शनात त्यांनी नवीन जागतिक विचार तसंच नवीन आयाम जोडले. त्यांनी दिग्दर्शित केलेल्या बॅरिस्टर, सखाराम बाईंडर, हमीदाबाईची कोठी, महानिर्वाण, पुरुष, हयवदन, वाडा चिरेबंदी, इत्यादी नाटकांनी मराठी रंगभूमीवर इतिहास घडवला. रावसाहेब, पेस्तनजी यासारख्या चित्रपटांमधून तसंच स्मृतिचित्रे सारख्या मालिकेतून त्यांनी आपला ठसा उमटवला होता. आपल्या दीर्घ कारकिर्दीत त्यांनी अनेक कलाकार घडवले. त्यांच्या या योगदानाबद्दल १९७५ सालचा संगीत नाटक अकादमी पुरस्कार त्यांना मिळाला होता, तर १९८६ साली रावसाहेब या चित्रपटातल्या भूमिकेबद्दल त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता.

आधुनिक मराठी नाट्यसृष्टीच्या शिलेदार आणि नाट्यक्षेत्रातल्या उत्कृष्टतेप्रती अमिट निष्ठा ठेवणाऱ्या रंगकर्मी आपण गमावल्या आहेत असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि एकनाथ शिंदे, सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांनीही दुःख व्यक्त केलं आहे..

ज्येष्ठ अभिनेता मोहन आगाशे विजयाबाईंना आदरांजली वाहताना म्हणाले..

**- - - होल्ड - बाईट - मोहन आगाशे - - -**

<><><><><>

ईशान किशन यानं ताज्या आयसीसी क्रिकेटपटू क्रमवारीत आपला सहकारी अभिषेक शर्माला मागे टाकत टी-२० आंतरराष्ट्रीय फलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थान पटकावलं आहे.

यावर्षी झालेल्या पुरुषांच्या आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेत ईशान किशननं शानदार फलंदाजी करत सुमारे २०० च्या स्ट्राइक रेटनं ३१७ धावा केल्या होत्या. त्याच्या या कामगिरीमुळे त्याला क्रमवारीत मोठी झेप घेता आली.

<><><><><>

राज्यातल्या महिला शेतकरी आणि शेतात काम करणाऱ्या महिला शेतमजुरांना त्या शेतकरी असल्याचा दाखला देणारं महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक आज विधानसभेत सादर करण्यात आलं. अशा दाखल्यामुळे शेती आणि त्या संबंधित असणाऱ्या सर्व सुविधा तसंच सेवांचा फायदा या महिला शेतकऱ्यांना मिळू शकणार आहे. यामध्ये कर्जमाफी, शेती विषयक सवलती, बी बियाणं, खतं, शेती विषयक कर्ज, पीक विमा आदी सेवांचा समावेश यामध्ये आहे. हे विधेयक कृषीमंत्री दत्ता भरणे यांनी विधानसभेत सादर केलं.

PCPNDT कायद्यांतर्गत, IVF सेंटर, सोनोग्राफी सेंटरची तपासणी करण्यासाठी विशेष कृती दल स्थापन करण्याची घोषणा आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत केली. राज्यातल्या ठेवीदारांच्या हक्कांचं रक्षण करण्यासाठी महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण सुधारणा विधेयक राज्य सरकारनं आज विधानसभेत सादर केलं.

<><><><><>

महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापतीपदी सचिन अहिर यांची आज एकमतानं निवड झाली. ही नियुक्ती निवडणूक होऊन नाही, तर एकमतानं होणं ही या सभागृहाची परंपरा असून ती यंदाही तशीच व्हावी, असं सांगून महाविकास

आघाडीचे उमेदवार जगन्नाथ अभ्यंकर यांनी आपला अर्ज मागे घ्यावा, अशी विनंती संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली, त्यानुसार अर्ज मागे घेतल्याची घोषणा अभिजित वंजारी यांनी केली. त्यानंतर आवाजी मतदानानं सचिन अहिर यांची एकमताने उपसभापती म्हणून निवड झाली.

**<><><><><>**

राज्यस्तरीय कृषी पुरस्कार २०२३ आणि २४ चं वितरण आज मुंबईत समारंभपूर्वक करण्यात आलं. यात २०२३ साठी ९१, आणि २०२४ साठी ९८, अशा एकूण १८९ पुरस्कारार्थींना सन्मानित करण्यात आलं. डॉ.संजय ज्ञानदेव पाटील आणि यज्ञेश वसंत सावे यांना डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कर देण्यात आला. तीन लाख रुपये, आणि  सन्मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

नैसर्गिक शेतीच्या क्षेत्रात महाराष्ट्र हा देशासाठी आदर्श ठरू शकतो, असं राज्पाल जिष्णु देव या समारंभाला संबोधित करताना म्हणाले. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, तसंच दत्तात्रय भरणे, राधाकृष्ण विखे पाटील, भरत गोगावले, आशिष जयस्वाल, इंद्रनील नाईक हे मंत्री उपस्थित होते.

**//<><><><><>//**